# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव

(आस्थापना शाखा)
आकाशवाणी चौकाजवळ, ता.जि.जळगाव पिन को. ४२५ ००१
दुरध्वनी क्र.:- ०२५७-२२२४१४१ फॅक्स क्र. :- ०२५७-२२२०५०० ई-मेल :- est.jalgaon@gmail.com

---

क्र.आस्थाप-४/कावि/२०२०/१/७/१२४६
दिनांकः १४/०५/२०२०.

प्रति,
उपविभागीय अधिकारी,
अमळनेर / एरंडोल / फैजपूर/ भुसावळ

**विषय** :- अनुकंपा भरती प्रक्रिये अंतग्रत तलाठी सवर्गासाठी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करणेबाबत...

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ दि.२२/०८/२००५ अन्वये अनुकंपा तत्वावर नियक्ती देण्यासंर्भात सुधारित कार्यपध्दती विहीत केली असून, त्यानुसार अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाची दुहेरी प्रतिक्षा सुची ठेवण्याची कार्यपध्दती अंमलात आणण्यात आली आहे.

त्यानुसार जिल्हाधिकारी जळगाव व त्यांचे अधिनस्थ कार्यालयांच्या आस्थापनांवरील माहे जानेवारी २०२० अखेरच्या वर्ग ३ संवर्गातील रिक्त पदांचा आढावा घेणेत आलेला आहे. त्या आधारे महसुल विभागाच्या वर्ग ३ सवर्गासाठीच्या अनुकंपा प्रतिक्षा सुचीतील खालील तक्त्यात दर्शविलयाप्रमाणे उमेदवार यांची तलाठी संवर्गासाठी निवड करून याद्वारे नियुक्ती आदेश निर्गमित करणेकामी आपणाकडेस पुरस्कृत करणेत येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव व वय | शिक्षण | टंक - लेखन | संगणक | पुरस्कृत करावायाचा सवर्ग | मुळ जात प्रवर्ग | पुरस्कृत केलेला उपविभाग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. कल्पेश वकील कुवर, रा. देवपूर धुळे ता. जि. धुळे. वय- २४ | बी. ए | -- | होय | तलाठी | इ.मा.व | अमळनेर भाग, अमळनेर |
| २ | श्री. अविनाश अनिल जंजाळे, संभाजी नगर पाचोरा वय- २९ | एम. ए | -- | होय | तलाठी | अनु. जाती | एरंडोल भाग,एरंडोल |
| ३ | श्री. वसीम राजू तडवी, रा.बोरखेडा ता. यावल जि.जळगाव वय- २२ | बी. ए | -- | होय | तलाठी | (अ.ज.) | फैजपूर भाग, फैजपूर |
| ४ | श्रीमती. मनिषा निलेश गायकवाड, रा. प्लॉट नं.३१. ता. भुसावळ वय- ३७ | बी. ए | -- | होय | तलाठी | खुला | भुसावळ भाग, भुसावळ |

Scanned by CamScanner

संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयास पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारास आपले उपविभागामध्ये समाविष्ट असलेल्या ज्या तालुक्यात जास्त रिक्त पदे आहेत त्या तालुक्यामधील रिक्त सजेवर नियमानुसार पदस्थापना देणेबाबतची कार्यवाही तात्काळ करावी. तसेच, आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

आपले कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात येणाऱ्या नियुक्ती आदेशामध्ये नियमित नियुक्ती आदेशातील अटींच्या व्यतिरिक्त पुढील अटींचा देखील समावेश करण्याची दक्षता घ्यावी.

१) संबंधित उमेदवार हे २ वर्षाकरिता परिविक्षाधीन तलाठी म्हणुन संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्या नियंत्रणाखाली राहतील.

२) परिविक्षाधीन कालावधीत संबंधित उमेदवाराची वर्तणूक असमाधानकारक आढळल्यास किंवा त्यांनी शासकीय कर्मचाऱ्यास अशोभनीय ठरेल असे कोणतेही कृत्य केल्यास त्यांची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

३) परिविक्षाधीन तलाठी या पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारास त्यांची प्रथम वेतनवाढ देण्यास परिविक्षाधीन कालावधीतील एक वर्ष पुर्ण झाल्यानंतर अनुमती देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ त्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण केल्यानंतरच मिळेल.

४) ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांवर झालेली आहे व ज्यांनी नियुक्तीपूर्वी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र निवड समितीकडे सादर केलेले नाही, अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. सर्व संबंधित उमेदवारांनी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी.

५) नियुक्ती प्राधिकारी म्हणून सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व अटी व शर्तींचा देखील समावेश आपल्या स्तरावरून निर्गमित करणेत येणारे आदेशात करण्यात यावा.

६) उपरोक्त तक्त्यातील उमेदवार यांचे संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी मुळ कागदपत्र तपासणी करून एक संच जतन करून आपल्या अभिलेखात ठेवण्यात यावा.

**( स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी जळगाव यांची स्वाक्षरी असे )**

**( रविंद्र भारदे )**
**निवासी उपजिल्हाधिकारी जळगाव**
**जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव**

D:\Anukampa\अनुकंपा नियुक्ती 2017\Order.docx

Scanned by CamScanner